दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २८७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.११ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# कामावर परत या, सर्व मागण्या मान्य होतील : खा.शरद पवार

## एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत शरद पवार, अनिल परब आणि कृती समितीमध्ये बैठक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत तोडगा काढण्यासाठी कृती समितीच्या सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेतली. तसेच परिवहनमंत्री अनिल परब आणि कृती समितीमध्ये एक बैठकही झाली. सरकारवर विश्वास ठेवा आणि कामावर परत या, तुमच्या सर्व मागण्या मान्य होतील असं आवाहन शरद पवार यांनी एसटी कर्मचाऱ्यांना केलं आहे. तसेच एसटीच्या विलिनीकरणाचा मुद्दा न्यायप्रविष्ट आहे, त्यामुळे समितीच्या अहवालानंतर त्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल असंही म्हटलं आहे.**



एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत सरकार सकारात्मक आहे, एसटीची बांधिलकी प्रवाशांशी आहे, त्यामुळे एसटी सुरू झाली पाहिजे यावर एकमत झाल्याची माहिती शरद पवारांनी दिली. तसेच विलिनीकरणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारची भूमिका काय आहे या प्रश्नावर बोलताना आपल्याला यावर राजकारण करायचे नाही. एसटीची बांधिलकी ही प्रवाशांशी आहे. विलीनीकरणाच्या मागणीवर राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. हा मुद्दा आता न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर काही भाष्य करणे योग्य नाही असं म्हटलं आहे.

कृती समिती आणि कामगार समितीचे जेवढे प्रतिनिधी आहेत, त्यांचा कामगारांच्या हिताबद्दलचा जो अर्ज आहे, त्यात प्रवाशांचं हित आणि एसटी टिकली पाहिजे याबाबत उल्लेख आहे. आम्ही कामगारांच्या समस्या मनावर घेणार नाही, असा समज काही लोकांनी पसरवला होता, त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी होती. त्यामुळे हा संप सोडवायला दोन महिने लागले. अन्यथा एवढा वेळ लागलाच नसता. तसेच आम्ही हा संप सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेत असं देखील शरद पवार यांनी म्हटलं आहे. एसटी संपाबाबत कृती समितीबरोबर आज विस्ताराने चर्चा केली. माझ्या दृष्टीने प्रवासी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. गेले दोन महिने संपामुळे प्रवाशांची जी स्थिती झाली, त्याबद्दलचे वर्णन न केलेले बरे. त्यातच कोरोनाचा नवा अवतार आल्यामुळे महाराष्ट्रावर आणखी एक संकट कोसळले आहे. अशी वेळ आधी कधीही आली नव्हती. मी यापूर्वी अनेकदा एसटी कामगारांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्यासाठी उपस्थित होतो. त्यावेळी एसटी कामगारांचा दृष्टिकोन एसटी आणि प्रवाशांबाबत विधायकच असतो हे मी जाणतो असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# मुंबई किनारा रस्ता प्रकल्प मुंबईकरांच्या जीवनाला गती देणारा : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प हे सर्व मुंबईकरांचे स्वप्न आहे. मुंबईकरांच्या जीवनाला गती देणाऱ्या या प्रकल्पाचे बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मेहनतीने आणि चिकाटीने करण्यात येत आहे. ठरलेल्या कालावधीत हा प्रकल्प पूर्ण होईल, याचा मला आत्मविश्वास असून प्रकल्पाच्या पहिल्या बोगद्याचे खणन जलदगतीने पूर्ण होणे, ही त्याची पोचपावतीच आहे, असे उद्गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काढले.

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (कोस्टल रोड) बांधकामात, पॅकेज ४ अंतर्गत प्रियदर्शिनी पार्क ते छोटा चौपाटी दरम्यान २.०७० किलोमीटर अंतराचा बोगदा दोन्ही बाजूने बांधण्यात येत आहे. पैकी मरिन ड्राइव्हकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी वापरात येणाऱ्या पहिल्या बोगद्याचे खणन दि. १० जानेवारी २०२२ रोजी पूर्ण झाले. त्याप्रसंगी आयोजित 'ऑनलाईन' समारंभात मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे हे दूरदृश्य प्रणाली (व्हिडिओ कॉन्फरन्स) द्वारे बोलत होते.



पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्हा पालकमंत्री श्री. आदित्य ठाकरे, खासदार श्री. अरविंद सावंत, महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, प्रभाग समिती अध्यक्ष श्रीमती मीनल पटेल हे देखील दूरदृश्य प्रणाली (व्हिडिओ कॉन्फरन्स) द्वारे यावेळी सहभागी झाले होते. तर मुंबईच्या महापौर श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) श्रीमती आश्विनी भिडे आदी मान्यवर प्रत्यक्ष स्थळी म्हणजे स्वराज्यभूमी (गिरगांव चौपाटी) येथे उपस्थित होते. तसेच, उपआयुक्त (विशेष अभियांत्रिकी) श्री. अजय राठोर, संचालक (भूसंपादन) श्री. अनिल वानखडे, प्रमुख अभियंता (किनारी रस्ता) श्री. विजय निघोट यांच्यासह कंत्राटदार एल ॲण्ड टी यांच्या वतीने प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री. संदीप सिंग, बोगदा बांधकाम व्यवस्थापक श्री. संतोष सिंग, सल्लागार कंपनी मेसर्स यूशीन कन्सल्टंटच्या वतीने बोगदा बांधकाम व्यवस्थापक श्री. नॅमकाक चो हेही उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, मावळा नावाचे बोगदा खणन करणारे संयंत्र त्याच्या नावाला साजेसे काम करीत असून त्याच शिस्तीने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन देखील या प्रकल्पाचे बांधकाम करीत आहे. नैसर्गिक वादळांसह कोविड संसर्गाचे संकट व त्यामुळे उद्भवलेली टाळेबंदी सारखी परिस्थिती यांना खंबीरपणे सामोरे जावून अविरतपणे प्रकल्पाचे बांधकाम सुरु आहे. समुद्राखालून दोन टोकं जोडण्याचे काम करण्यात मावळा संयंत्र यशस्वी झाले आहे. किनारा रस्ता प्रकल्प हे एकप्रकारे मुंबईचे स्वप्नं आहे. फक्त रस्ता बांधून न थांबता त्याच्या भोवती रमणीय व प्रेक्षणीय जागा विकसित केल्या जाणार आहेत. या प्रकल्पाच्या बांधकामात अनेक आव्हाने आहेत. मात्र महानगरपालिकेने ही आव्हाने स्वीकारुन मुंबईकरांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने दमदार वाटचाल सुरु ठेवली आहे. प्रकल्प निर्मितीसाठी राज्य सरकारकडून पूर्ण सहकार्य व पाठबळ मिळेल, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री श्री. आदित्य ठाकरे म्हणाले की, किनारा रस्त्याच्या पहिल्या बोगद्याचे खणन आज पूर्ण झाले असून हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हे काम आत्यंतिक कठिण स्वरुपाचे असून ते यशस्वीरित्या वर्षभराच्या आत पार पाडणे, ही विक्रमी स्वरुपाची कामगिरी आहे. मुंबईकरांचे राहणीमान सुखकर करण्याच्या दृष्टीने अर्थात 'इज ऑफ लिविंग'साठी विविध कामे मुंबई महानगरात सुरु आहेत. गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता, पारबंदर प्रकल्प .../२

# श्रीवर्धन नगरपरिषदेच्या डम्पिंग ग्राऊंडला आग, पोलिसांसह महसूल प्रशासनाचे पंचनामे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

काल रात्री श्रीवर्धन नगरपरिषदेच्या डम्पिंग ग्राऊंडला मोठ्या प्रमाणात आग लागली या आगीमध्ये फक्त प्लास्टिकचे गठ्ठे तीन ठिकाणी ठेवलेले होते तेवठयाच ठिकाणी जळून खाक झाली आहेत. डंपिंग ग्राउंडच्या ठेकेदाराला ज्या ठिकाणी भंगारा पासून उत्पन्न मिळते ते सर्व जागच्या जागी आहे. त्याला कोणत्याही प्रकारची आग लागलेली नाही. आग लागल्याची बातमी श्रीवर्धन मधील सामाजिक कार्यकर्त्या प्रभावती उपाध्ये या बाजूलाच राहत असल्याने त्यांना सर्वप्रथम कळली. त्यानंतर प्रभावती उपाध्ये यांनी श्रीवर्धनमध्ये येऊन त्या ठिकाणी आग लागल्याची बातमी आजूबाजूच्या शेतकऱ्यांना कळवली. त्यानंतर डम्पिंग ग्राउंड च्या बाजूला असलेल्या शेतकऱ्यांनी याबाबत खात्री करून घेतल्यानंतर श्रीवर्धन पोलीस ठाण्यात कळविण्यात आले.

श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी त्या ठिकाणी दाखल झाले. त्याचप्रमाणे श्रीवर्धनचे प्रांताधिकारी अमित शेडगे त्याचप्रमाणे श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे त्याठिकाणी दाखल झाले. त्यानंतर श्रीवर्धन नगरपरिषदेच्या फायरफायटर गाड्या त्याठिकाणी दाखल झाल्या फायरफायटर आल्यानंतर आग नियंत्रणात आली. परंतु त्या ठिकाणी असलेल्या शेड मधील सर्व लोखंडी चॅनेल वाकडेतिकडे झाल्याचे निदर्शनास आले. मात्र आग ही कोणी लावली याबाबत अद्यापही कोणती माहिती प्राप्त झालेली नाही. जेव्हा श्रीवर्धन नगरपरिषदेने डम्पिंगग्राउंड साठी ही जागा संपादित केली त्या वेळेपासून त्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या डम्पिंग ग्राउंडला विरोध होता. तरीही नगरपरिषदेने त्याठिकाणी डम्पिंग ग्राऊंड व खत निर्मिती प्रकल्प सुरू केला. खत निर्मिती .../२

# गटई कामगार युनियनने स्वीकारले भाजपचे नेतृत्व

## पदाधिकारी व सदस्यांचा जाहीर प्रवेश, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले स्वागत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे नोडमधील गटई कामगार युनियनच्या पदाधिकारी व सदस्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, कोपर प्राथमिक शाळा अध्यक्ष अनंता ठाकूर, पी. के. ठाकूर, किशोर पाटील, कैलास घरत, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, सदस्य योगिता ठाकूर, कामिनी कोळी, सुनीता घरत, उषा देशमुख, उलवे नोड उपाध्यक्ष सुजाता पाटील आदी उपस्थित होते. या वेळी गटई कामगार युनियनचे अध्यक्ष जगजीवनराम राधेलाल राठौड, उपाध्यक्ष कैलाश गुलाबचंद अमकरे, सचिव जयसिंग फकिरा परमेश्वर, खजिनदार राजकुमार गजराज मंडराई, सदस्य राजेश शंकर परमेश्वर, विजय शांतिलाल बघेले, संतोष भोजराम मंडराई, प्रवीण विनय शिंदे, सुखदेव रामप्रसाद लोंगरे, रामलखन प्रेमलाल साकेत, राधेलाल बाल्या राठौड, सोहनलाल प्यारेलाल लोंगरे, नंदलाल राधेलाल राठौड, तुलसीराम बालाराम डोयरे, हेमंत श्याम गन्नोरे, रामजीवन मांगीलाल निमोरे, सुरज लालमणी, राजेंद्र साकेत, पूजा जगजीवन राठौड, क्षमाबाई भोजराम मंडराई, ललिता हेमंत गन्नोरे, ज्योती जयसिंग परमेश्वर, राधाबाई तुलसीराम डोयरे, क्षमाबाई प्यारेलाल लोंगरे, सावित्रीबाई राधेलाल राठौड, चंदा सोहनलाल लोंगरे, गुड्डन रामलखन साकेत, प्रियंका प्रवीण शिंदे, प्राची राजेश परमेश्वर, नंदनी विजय बघेले, सुशिला रामभरोस राठौड, किरण सोनू राठौड, अनिता महावीर डिड्वानिया, रेखाबाई कैलाश .../२

## संक्षिप्त...

### मुंबईतील 'ईडी'चं मुख्यालय हलवणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राजकीय नेते आणि सेलिब्रिटींवरील कारवाई आणि चौकशांमुळे कायमच चर्चेत असलेले मुंबईतील सक्तवसुली संचलनालयाचे कार्यालय लवकरच नव्या जागेत हलवण्यात येणार आहे. सध्या दक्षिण मुंबईतील बॅलर्ड पिअर येथे ईडीचे मुख्यालय आहे. मात्र, आता ते वरळी येथे हलवण्यात येईल. विशेष म्हणजे वरळीतील ईडीच्या कार्यालयाची जागा कुख्यात गुंड दाऊदचा हस्तक इकबाल मिर्ची याची आहे. इक्बाल मिर्चीच्या निधनानंतर त्याच्या मालकीचे वरळीतीली सीजे हाऊस मध्यंतरी खूप चर्चेत आले होते. एकेकाळी ड्रग्ज तस्करीसाठी वापरल्या जाणाऱ्या जागेत आता ईडीचे कार्यालय उभे राहणार आहे.

इक्बाल मिर्ची याने सीजे हाऊसची जागा मिलेनियम डेव्हलपर्सला विकली होती. त्यानंतर याठिकाणी इमारत उभी राहिली होती. या इमारतीमध्ये इक्बाल मिर्चीच्या कुटुंबीयांना ५ हजार चौरस फूट आणि ९ हजार चौरस फुटाच्या दोन अलिशान सदनिका मिळाल्या होत्या. इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर या सदनिका आहेत.

# खोटं बोलायचे नाही झेपेल तितकाच शब्द द्यायचा हि तटकरेंची शिकवण : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

कोरोनाच्या काळात रखडलेली काम आता होणार नाहीत. तटकरे फक्त आश्वासन देतात काम करत नाहीत असा विरोधकांकडून गैरसमज पसरवण्यात आला होता. मात्र खोटं बोलायचे नाही झेपेल तितकाच शब्द द्यायचा खोटं वचन द्यायचे नाही अशी खा. तटकरेंची शिकवण असल्याचं राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री ना. आदितीताई तटकरे यांनी व्यक्त केलं. श्रीवर्धनमधील बापदेव मंदिर जीर्णोद्धार भूमिपूजन, परीट समाज सामाजिक सभागृह भूमिपूजन, कुंभार समाज सामाजिक सभागृह भूमिपूजन समारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष फैसल हुर्जुक, शहराध्यक्ष जितेंद्र सातनाक, उपनगराध्यक्ष यशवंत चौलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कोरोनाच्या काळात वर्षभरात आपला आमदार निधी कोविडसाठीच वापरायचा आश्या सूचना होत्या. आता आमचा आमदार निधी इतर कामासाठी वापरण्यासाठी परवानगी दिली. त्यामुळे स्थानिक प्रतिनिधी म्हणून मला माझ्या आमदार निधीतून काम टाकण्याची संधी मिळाली. माझा पहिला आमदार निधी आज होत असलेल्या विकास कामांसाठी वापरला जात आहे. माझ्यासाठी अत्यंत आनंदाची असल्याचं मत ना. आदिती तटकरे यांनी व्यक्त केलं. काम होणार नाहीत असं सांगून दिशाभूल करणाऱ्या विरोधकांना आपण महत्व न देता खा. सुनील तटकरेंवर ठेवलेला विश्वास आणि आपण पाळलेला संयम महत्वाचा आहे. निसर्गचक्री वादळात मोठं नुकसान झालं त्यामुळे विकासकाम काम चांगल्या दर्जाची व मर्यादित कालावधीत झाली पाहिजेत आश्या सूचना देखील ना. आदिती तटकरे यांनी संबंधित अधिकारी व .../२

## पनवेलमध्ये भाजपची स्वाक्षरी मोहीम

# २०१४ सालापासून पंतप्रधान मोदी यांनी केलेले काम काँग्रेसच्या डोळ्यात खुपते : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आम्ही सर्व नागरिक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोबत आहोत, हे दर्शवण्यासाठी पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पनवेल तालुका भाजपच्यावतीने फलक लावण्यात आला असून, त्या फलकावर आपली स्वाक्षरी करून पाठिंबा दर्शवण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. आज (सोमवार दि.१० जानेवारी) सकाळी ११ वाजता भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्वाक्षरी मोहिमेला सुरुवात झाली. यावेळी पंजाबमधील काँग्रेस सरकरचा निषेध नोंदवून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अमरीश मोकल यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंजाबमध्ये घडलेल्या प्रकारच्या निषेधार्थ पनवेल तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पंजाबमध्ये प्राणांतिक संकट ओढवले होते. त्यांच्या सुरक्षेबाबत ज्या राज्यात त्यांचा दौरा होता त्या पंजाबमधील काँग्रेस सरकारने अक्षम्य दिरंगाई, बेजबाबदारपणा करून एक प्रकारे विघटनवादी शक्तींना मदत केली. देशात घडणाऱ्या घटना या आपल्या दृष्टीने चिंताग्रस्त करणाऱ्या आहेत, अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, जेंव्हा देशाचे पंतप्रधान राष्ट्रीय स्मारकाचे लोकार्पण करण्यासाठी पंजाबमध्ये गेले तेंव्हा हा कार्यक्रम पक्षाचा नसुन शासकीय होता. तसेच वेगवेगळ्या कार्यक्रमांचे .../२



# संक्षिप्त...

## ब्राह्मण मंडळ रोहा आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फुर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

ब्राह्मण मंडळ रोहा व अभंग सेवा मंडळ रोहा तर्फे रविवार दिनांक ९ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास रोहेकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला, या शिबिरात ६४ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले.

सदर रक्तदान शिबिराचे उद्घाटन व दीपप्रज्वलन ब्राह्मण समाजातील दानशूर व प्रतिष्ठित व्यक्तिमत्व श्री. सुभाषदादा मेहेंदळे, तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. श्रीकांत ओक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी श्री. सुभाषदादा मेहेंदळे यांनी ब्राह्मण मंडळ रोहाच्या कार्याला शुभेच्छा देऊन मंडळाच्या कार्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याचा मानस व्यक्त केला. सदर रक्तदान शिबिराला रायगडच्या पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांनी सदिच्छा भेट दिली,यावेळी त्यांनी शिबिराच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल आयोजकांचे विशेष कौतुक केले. त्यांच्यासमवेत नगरसेवक महेंद्र गुजर, महेंद्र दिवेकर, महेश कोल्हटकर, शहर अध्यक्ष अमित उकडे, चंद्रकात पार्टे आदी मान्यवर उपस्थित होते.

रोह्याचे माजी नगराध्यक्ष संजय कोनकर,समीर शेडगे, भाटे वाचनालय अध्यक्ष किशोर तावडे, ज्वेलर्स असोसिएशन अध्यक्ष राकेश जैन, मनोज जैन, सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट अध्यक्ष राजेश काफरे, रोटरी क्लबचे राकेश कागडा आदींनीही रक्तदान शिबिराला भेट दिली. शिबिराचा समारोप रोहे तह-सीलदार कार्यालयाच्या नायब तहसिलदार सौ. मानसी साठे व सेवाभाव जपणारे सुप्रसिद्ध डॉक्टर शंतनु आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. समारोपप्रसंगी शासकीय रक्तपेढि अलिबागचे डॉ. दिपक गोसावी व त्यांच्या टीमचा सन्मान करण्यात आला. रक्तदान शिबिर यशस्वी होण्यासाठी ब्राह्मण मंडळ रोहा अध्यक्ष अमित आठवले यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष आनंद काळे, सचिव निखिल दाते, खजिनदार चैतन्य आठवले,प्रकाश कुंटे, सौ. नेहा आवळसकर, सुमित रिसबुड, श्रीनिवास रिसबुड, उदय गोखले,नितीन जोशी,मोहन साठे, सचिन आठवले,सुरेंद्र आगरकर, विवेक बापट, महेश पेंडसे,चिन्मय बापट, श्रीपाद जोशी, सौ. मानसी दाते, सौ. संगीता फाटक, सौ. आरती धारप,सौ. प्राजक्ता पाटणकर आदींसह समाजबांधवांनी विशेष मेहेनत घेतली.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री.बाळाराम परशुराम ठाकूर व इतर ९ यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देण्यात येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकांस खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमाान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकांस खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही हक्क, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणर नाही.

**परिशिष्ट** :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे : पुनाडे येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं.१३२ हिस्सा १५ यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर ४५ आर ५० प्रति, व पोटखराबा ०० हेक्टर ०८ आर ८० प्रति, यांसी आकार रक्कम रुपये ३.८७ पैसे, यांसी चतुःसिमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त

रायगड
दिनांक : ११/०१/२०२२

**सही/-**
**श्री.विनायक ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकील**
**३०२, आशापूरा रेसिडेन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ९६१९२२८७२७**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकतीचे क्षेत्र त्या मिळकतीसमोर लिहिलेल्या मालक / कब्जेदारांचे कडून आमचे अशिल दिपाली सत्यजीत भांड हे कायम खरेदी करण्याच्या विचारात आाहेत. सदर मालक / कब्जेदार यांनी आमचे अशिल कडून ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा स्वीकारून लेखी करार केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मालडुंगे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक / कब्जेदाराचे नांव | गट नं. | हिस्सा नं. | विक्री क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री.तात्या उर्फ अभिमन्यू यज्ञेश्वर पाटील व इतर २२ | १० | १/अ | एकूण ०-६९-५० पैकी ०-५२-४० | १.३६ |
| **श्री.वसंत गणपत पाटील, श्री.वासुदेव धर्मा पाटील व श्री.प्रदीप यज्ञेश्वर पाटील यांचे हिश्श्याचे ००-१७-१० क्षेत्र अथवा त्यांचे हिश्श्याचे क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राकरिता.** | | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत. अन्यथा मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन, आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग, मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १०/०१/२०२२

**कार्यालयीन पत्ता :-**
**फ्लॅट नं.४०६, बी-विंग, ड्रिम रेसिडेंन्सी,**
**प्लॉट नं.०८, सेक्टर ४, करंजाडे,**
**ता.पनवेल, जि.रायगड.**
**मोबाईल नं.८१०८९८६५८८/९३२६४२४०६३**

**सही/-**
**ॲड.कुलदीप आर. पाटील**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**


# लॉकडाऊन होऊ नये यासाठी माथेरानच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने घेतली आ.महेंद्र थोरवेंची भेट



**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व पर्यटन क्षेत्रे संपूर्ण बंद करण्यात येणार आहेत त्यामुळे माथेरान मधील नागरिकांना याची झळ सोसावी लागणार आहे याकामी शिवसेना, काँग्रेस ,आणि शेकापच्या पदाधिकारी आणि शिष्टमंडळाने कार्यसम्राट आमदार महेंद्र शेठ थोरवे साहेबांची भेट घेतली तसेंच आमदार साहेबांनी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना त्वरित संपर्क साधून माथेरान मधील पर्यटन सुरू ठेवण्यासाठी सहानूभूती पूर्वक विचार करावा असे स्पष्ट केले.

याठिकाणी अन्य व्यवसायाचे साधन उपलब्ध नाही केवळ पर्यटनावर अवलंबून असलेले हे स्थळ आहे नव्वद टक्के लोक हे कष्टकरी आहेत. लॉक डाऊन केल्यास कष्टकरी श्रमिकांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. राज्यात सर्वत्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊन जा-हीर करण्यात येत आहे.अनेक पर्यटनस्थळ सुध्दा यामध्ये समाविष्ट केली जात आहेत. परंतु माथेरान हे असे एकमेव ठिकाण आहे की या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांवर सर्वांचे जनजीवन अवलंबून असते कारण इथे शेती त्याचप्रमाणे अन्य औद्योगिक क्षेत्र, कंपनी अथवा कारखाने नाहीत त्यामुळेच इथला सर्वच कष्टकरी बांधव यामध्ये अश्वपाल, हातरीक्षा चालक वर्ग तसेच हमाली करणारे मजूर ,लहान मोठे स्टॉल धारक यांचे हातावर पोट असते.

त्याचप्रमाणे व्यापारी वर्ग सुध्दा इथे भरपूर प्रमाणात आहेत लॉक डाऊन केल्यास आम्हा सर्वांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते तरी लॉक डाऊन करताना काही नियम अटी असल्या तर हरकत नाही परंतु पूर्ण लॉकडाऊन केल्यास इथल्या नागरिकांना खूप त्रासदायक ठरणार आहे. याकामी आपल्या माध्यमातून वरिष्ठांना इथली संपूर्ण परिस्थिती लक्षात आणून दिल्यास हे पर्यटनस्थळ सुरू राहील असेही सर्व उपस्थित शिष्टमंडळाने विद्यमान आमदार महेंद्र शेठ थोरवे यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, उप शहर प्रमुख प्रमोद शेठ नायक, सामजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मनोज खेडकर, शेकापचे अध्यक्ष शफीक बढाणे, उमेश कदम, वन समिती अध्यक्ष योगेश जाधव, मा. नगरसेवक शिवाजी शिंदे, पतसंस्था सभापती हेमंत पवार, संदीप शिंदे, गौरंग वाघेला, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे, यांसह अन्य माथेरान कर मोठया संख्येने उपस्थित होते.

# तळा नगरपंचायत ; चार अर्ज मागे, आता प्रचाराचा घुमशान

**दै.रायगड नगरी । तळा**

गेल्या आठ दिवसांपासून उमेदवारी मिळवण्यासाठी सुरू असलेली सेटिंग त्यानंतर अर्ज भरण्यासाठी सुरू झा-लेली धडपड. नंतर अर्ज मागे घेण्यासाठीची मनधरणी आमिषांचं गाजर अशा सर्व गोंधळात अखेर आज अर्ज मागे घेण्याची वेळही संपली आहे. त्यामुळे आता नगरपंचायत निवडणुकीचा तळा शहरात धुरळा उडणार आहे. १७ प्रभगापैकी १३ प्रभागातील निवडणूक पार पडली असून चार जागांसाठी निवडणूक पार पडत आहेत. या चार प्रभागात जो बाजी मारेल त्याच्या हातात सत्तेची चावी राहणार आहे त्यामुळे या चारही जागेसाठी राजकीय पक्षांनी आ-पली ताकद पणाला लावली आहे त्यामुळे या निवडणुकीत कोण बाजी मारणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलं आहे.

एकूण १८ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरल्या नंतर आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चार अर्ज मागे घेण्यात आले यामध्ये प्रभाग क्रमांक १ मधून टिळक अमृता विराज, प्रभाग क्रमांक ३ मधून ठसाळ वैभवी विलास या दोन्ही भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी आपला अर्ज मागे घेतला आहे.त्याप्रमाणे प्रभाग क्रमांक १४ मधून कुरुक्कर जमालुद्दीन अब्दुल्ला-आणि मुंढे रेश्मा रविंद्र या दोन्ही अपक्ष उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

अर्ज मागे घेतल्यामुळे प्रभाग क्रमांक १ मध्ये १)बामणे ग्रिष्मा गणेश - राष्ट्रवादी २)मांडवकर शुभांगी हिरू - शिवसेना यांच्यात सरळ सरळ लढत होणार आहे. प्रभाग क्रमांक ३ मध्ये १)मेहत्तर यामिनी जनार्दन - राष्ट्रवादी, २) तळेकर विद्या विलास - शिवसेना ३) तळेकर रोशनी निलेश - शेकाप, यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. प्रभाग क्रमांक १० मध्ये १) शिगवण मंगेश रामचंद्र - राष्ट्रवादी, २) फोंडळ प्रविण भागोजी - शिवसेना, ३) वेदक संस्कृती हर्षद - शेकाप, ४) वेदक किशोर गणेश - भाजपा अशी चौरंगी सामना होणार आहे. प्रभाग क्रमांक १४ मध्ये १) मुंढे रितेश रविंद्र - अपक्ष, २) मोरे देवयानी समीर - राष्ट्रवादी, ३) मुंढे लता जनार्दन - अपक्ष, ४) शिर्के योगेश वामन - शिवसेना, ५) रहाटविलकर तब्बसुम -अपक्ष, असा पंचरंगी सामना होणार आहे.

# खारघर सेक्टर १८ येथे मोफत नेत्र चिकित्सा शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फकीरअहमद रहीम भंडारे चॅरिटेबल ट्रस्ट व डॉक्टर अग्रवाल आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रीम टॉवर सेक्टर १८ येथील फ्युचर जनरेशन ग्रुप ऑफ स्कूल यांच्या इमारतीमध्ये मोफत नेत्र चिकित्सा शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

सामाजिक बांधिलकी आणि समाजाप्रती असणाऱ्या जबाबदारीचे भान ठेवून उपयुक्त नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. विशाल माने पोलीस इन्स्पेक्टर नवी मुंबई आयुक्तालय यांच्या शुभहस्ते करण्यात आले. फकीर अहमद रहिम साहेब भंडारी अर्थात एफ आर बी चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी डॉक्टर विशाल माने यांनी कार्यक्रमाची भरभरून कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल गौरव उद्गार काढले व सर्व सामान्य लोकांना अतिउच्च हॉस्पिटल ची सुविधा मोफत मिळण्याची सोय करून दिल्याबद्दल एफ आर बी चारिटेबल ट्रस्टचे भरभरून आभार मानले आणि कौतुक केले, सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इस्माईल भंडारी, अमोघसिद्ध पाटील सर आर. एस. पी. अधिकारी तसेच भारती विद्यापीठ चे प्रा. चौरे सर यांनी सहकार्य केले. या शिबिरामध्ये जवळजवळ १८५ नागरिकांनी आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली. सर्व मान्यवरांचे व मेडिकल टीमचे शाळेच्या प्रिन्सिपल व एफ आर बी चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्ष कलीम भंडारी यांनी आभार मानले.


### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२१३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०१/०३/२०२२

श्रीमती.सिताबाई अनंत ठाकूर — अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.रमाबाई श्रावण ठाकूर — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. भिमाबाई दामू पाटील हे हयात नसून त्यांचे निधन दि.२५/०६/२०१७ रोजी जासई येथे झाले आहेत, त्यांना वारस श्रीमती.कानुबाई धाऊ पाटील, श्रीमती.रमाबाई श्रावण ठाकूर व श्रीमती.सिताबाई अनंत ठाकूर ह्या मुली हे कायदेशीर वारस आहेत. कै.श्रीमती.कानुबाई धाऊ पाटील आजमितीला हे हयात नसून त्यांचे निधन दि.८/०५/२०२१ रोजी खारकोपर येथे झाले आाहेत. त्यांना वारस श्री.बळीराम धाऊ पाटील हा मुलगा श्रीमती.नंदा रामदास म्हात्रे व श्रीमती.यशोदा मच्छिंद्र गायकवाड ह्या मुली हे कायदेशीर वारस आहेत. कै.भिमाबाई दामू पाटील त्यांस वारस असलेबाबतचा दाखला मिळणेकरिता श्रीमती.सिताबाई अनंत ठाकूर ही मुलगी, श्री.बळीराम धाऊ पाटील हा नातू श्रीमती.नंदा रामदास म्हात्रे व श्रीमती.यशोदा मच्छिंद्र गायकवाड ह्या नात यांनी मे.दिवाणी न्यायालय, उरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

**मौजे : जासई, ता.उरण येथील पुढील वर्णनाच्या मिळकतीचे संपादन अनुक्रमे जासई युनिट केस क्रमांक १८५ व २०/९८ अन्वये झाली.**

| अनु. क्र. | मौजे | युनिट केस क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जासई | १८५ | २७ | ७ | ०-१०-९ | ०.३७ |
| | | | २७ | ५ | ०-३८-७ | १.३१ |
| २ | जासई | २०/९८ | १६६ | ३ | ०-५९-० | १ |

त्यांचे वारसा बाबत, कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास हे मे.कोर्ट सौ.नेहा कुणाल तांडेल ह्यांच्या हक्काबाबत पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व अर्जदार व सामनेवाला रमाबाई श्रावण ठाकूर हे कै.भिमाबाई दामू पाटील यांचे वारसदार आहेत, असे वारस असल्याबद्दल त्यांना हा वारसदाखला मंजूर करेल.

आज दि.०७/०१/२०२२ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**



मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
ॲड.स्वाती सोनावणे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.४२८/२०२१
नि.नं.७
ने.ता.१६/०२/२०२२

श्रीमती.कौशल्या मारुती तांबेवाघ
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सी-१०४, साईशास्त्र को.ऑप.हौ.सो.,
प्लॉट नं.२७, सेक्टर ११, खारघर, पनवेल, रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.मारुती दादू तांबेवाघ हे दि.०४/०७/२०१७ लिलावती हॉस्पिटल येथे मयत झालेले आहेत. आणि अर्जदार श्रीमती.कौशल्या मारुती तांबेवाघ, वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी रा.सी-१०४, साईशास्त्र को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.२७, सेक्टर ११, खारघर, पनवेल, रायगड यांनी या कोर्टास सदरहू मयत यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : खारघर, पनवेल येथील मिळकत / सदनिकाचे खरेदी कराराप्रमाणे वर्णन**

| अपार्टमेंट | बिल्डींग | फ्लॅट क्रमांक | सेक्टर क्र. | प्लॉट नं. | ॲडमेझरिंग एरिया | बाजारमुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| साईशास्त्र को.ऑप. हौ.सो. | सी | १०४ | ११ | २७ | १५०८.१२५ स्क्वे.मीटर | ५,०२,९४१/- |

सदर मिळकतीस चतुःसिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वेस : प्लॉट नं.३४ व ३५
पश्चिमेस : २४ मीटर वाईड रोड
उत्तरेस : प्लॉट नं.२६
दक्षिणेस : प्लॉट नं.२८

वारस दाखला मिळावे असा अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदार हे मयत कै.मारुती दादू तांबेवाघ यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्याांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वररील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.मारुती दादू तांबेवाघ यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यांस वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१०/१/२२ रोजी माझ्या सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# मोबाईल अंकित होऊ नका : डॉ.यशवंत शितोळे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

गोखले एज्यु.सोसायटीच्या श्रीवर्धन येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे नुकतेच करिअर कट्टाया कार्यक्रमाचेआयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञानकेंद्राचे अध्यक्ष प्रा.यशवंत शितोळे, करिअर कट्ट्याच्यापुणे जिल्हा समन्वयक डॉ.राणी शितोळे, रायगड जिल्हा समन्वयक डॉ.बी.के.शिणगारे, डॉ.अरुण पाटील अलिबाग यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्व अतिथींचे स्वागत व प्रास्ताविक कॉलेजचेकरिअर कट्टा समन्वयक प्रा.निलेश चव्हाण आणि प्रा.नवज्योत जावळेकर यांनी केले. आजची पिढी मोबाईल अंकित झाली आहे. मोबाईलमुळे विद्यार्थ्यांची विचार प्रक्रिया खंडित झाली आहे. व्यक्तीगत व व्यावसायिकजीवनात मोबाईल अपरिहार्य असला तरी समाजाचेमानसिक व शारीरिक स्वास्थ्य बिघडत आहे. कुटुंबातील सुसंवाद कमी झाला आहे.

एकूणच स्वतःच्या करिअर-संबंधीची उदासिनता वाढत आहे अशी खंत डॉ.यशवंत शितोळे यांनी व्यक्त केली. मी कसा घडलो, आय.ए.एस आपल्या दारी या माध्यमातून महाविद्यालय करिअर काऊन्सिलींग अंतर्गत अनेक यशस्वी अधिका-यांचे मनोगत व व्याख्यानांचे आयोजन नेहमीच करते. स्पर्धा परीक्षांसाठी सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात व मार्गदर्शनही केले जाते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्वासाठी व जडणघडणीसाठी महाविद्यालय नेहमीच कटिबद्ध आहे असे विचार प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी व्यक्त केले. प्रा.डॉ.कल्याणी नाझरे यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्र संचालन प्रा.नवज्योत जावळेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी प्रयत्नशील होते.


मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
श्री.निवृत्ती बा. पावशे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१९४४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०२/२०२२

श्री.रमेश श्रीनिवास राव
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सदनिका क्र.२०१, दुसरा मजला, बिल्डींग नं.१,
साक्षीपार्क २, शिलोत्तर रायचुर, पालीदेवद,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

ज्याअर्थी कै.श्रीनिवास रामराव उर्फ रामा राव हे दि.१३/०६/२०२१ रोजी सदनिका क्र.२०१, दुसरा मजला, बिल्डींग नं.१, साक्षीपार्क २, शिलोत्तर रायचुर, पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६. येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.श्रीनिवास रामा राव यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**कै.श्रीनिवास रामा राव यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

**मिळकतींचे वर्णन**

**सदनिका क्र.१०४, पहिला मजला, सिद्धीविनायक ज्वेल, प्लॉट क्र.३०३, सेक्टर १९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड. (क्षेत्रफळ २९.८५० चौ.मी. कारपेट + २.०६० चौ.मी.सीबी.)**

वरील अर्जदार हे मयत कै.श्रीनिवास रामा राव यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे, याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.श्रीनिवास रामा राव यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१०/१/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
ॲड.एम.जे.पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.२०२०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०३/२०२२

श्रीमती.रशिदा फकीरमोहमद शेख
वय : ६३ वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

१) अर्जदाराचा मयत मुलगा अब्दुलसत्तार फकीर शेख हा दि.०८/०६/२०२० रोजी मु.वावंजे येथे नैसर्गिकरित्या मरण पावला व अर्जदार हिचे पती फकीर आदमजी शेख हे दि.२९/०६/२०११ रोजी मरण पावले. मरतेसमयी अर्जदार यांचा मुलगा अब्दुलसत्तार फकीर शेख हा त्रिडेंट सर्विस प्रा.लिमिटेड, प्लॉट नं.-EL ५४, इलेक्ट्रॉनिक झोन, टी टी सी इंडस्ट्रीयल एरिया एम.आय.डी.सी., म्हापे, नवी मुंबई येथे नोकरी करत होता व त्याची कर्मचारी भविष्य निधी संघठन भारत सरकार यांचे कार्यालयात पी एफ रक्कम जमा असून अब्दुल सत्तार फकीर शेख यांनी अर्जदाराचे नाव नॉमिनी म्हणून कार्यालयात दिले नव्हते.

२) अर्जदाराचा मुलगा अब्दुलसत्तार फकीर शेख यांचे कर्मचारी भविष्य निधी संघठन भारत सरकार येथे यु ए नं.खाते क्र.१०१२२४५७२४४९ असून पी एफ रक्कम रु.-५८,९८२/- व रु.९,७१८/- अशी एकूण टोटल रक्कम रु.६८,७००/- इतकी आहे. अर्जदारास ती काढून घेण्याासाठी कर्मचारी भविष्य निधी संघठन भारत सरकार यांनी अर्जदार यांच्याकडे सक्सेशन सर्टीफिकेटची मागणी केली आहे.

अर्जदार ही अब्दुलसत्तार फकीर शेख यांची वारस आहे. अर्जदाराचा मुलगा अब्दुलसत्तार फकीर शेख यांचे कर्मचारी भविष्य निधी संघठन भारत सरकार येथे यु ए नं. खाते क्र.१०१२२४५७२४४९ असून पी एफ रक्कम रु.५८,९८२/- व रु.९,७१८/- अशी एकूण टोटल रक्कम रु.६८,७००/- इतकी आहे. त्याकामी योग्य त्या ऑथरीटीस देण्यासाठी सक्सेशन सर्टीफिकेट / वारस दाखला देण्याची जरुरी आहे. अर्जदार ही अब्दुलसत्तार फकीर शेख यांचे वारसदार आहेत. म्हणून तसे सक्सेशन सर्टीफिकेट मिळावे म्हणून अर्जदाराने कोर्टात अर्ज दाखल केला आहे. ज्या कुणाही व्यक्तीला या बाबतीत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात १ महिन्याच्या आत हजर राहून किंवा वकीलामार्फत हरकत घ्यायची आहे. योग्य मुदतीत हरकत आली नाही तर मे.कोर्ट हक्काबद्दल पुरावा घेण्याची कारवाई करेल. आणि जर अर्जदार ही अब्दुलसत्तार फकीर शेख यांची वारस आहे असे सिद्ध झाल्यास त्यांना तसे सक्सेशन सर्टीफिकेट मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१०/१/२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.


**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## शिष्यवृत्ती परीक्षेत कु.अविष्का घरतचे नेत्रदीपक यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य परीक्षा महामंडळा मार्फत ऑगस्ट २०२१ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता पाचवी) निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत कु.अविष्का महेश घरत इयत्ता पाचवी मराठी माध्यम हिने नवी मुंबई विभागात प्रथम तर ठाणे जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकाविला आहे. तिला ८७.३३ टक्के गुण मिळाले आहेत.



कु.अविष्का महेश घरत ही ज्ञान विकास प्राथमिक विद्यालय कोपरखैरणे या विद्यालयाची विद्यार्थिनी असून या विद्यालयाचे ओमकार तानाजी काळे ,सत्यवान संदीप धापते, साईराज संतोष बैलकर, शिवराज अनिल चटाले हे चार विद्यार्थी सुद्धा शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

कु.अविष्का महेश घरत हिस मिळालेल्या या घवघवीत यशाबद्दल तिचे संस्थेचे अध्यक्ष ड.पी.सी.पाटील, मार्गदर्शक दळवीसर,पडळकरसर, बोडकेसर तसेच सौ. ईशा सावंत, अलका चव्हाण, मुख्याध्यापिका सुमित्रा पाटील यांनी विशेष कौतुक केले आहे.

## स्कुटीची वॅगेनर गाडीस धडक; एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील कर्नाळा खिंड येथील खारपाडा ते पनवेल रस्त्यावर कर्नाळा पक्षी अभयारण्याच्या समोर असलेल्या गतिरोधकाजवळ भरधाव स्कुटीवरील चालकाने त्याच्या पुढे चाललेल्या पाठीमागून ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात स्कुटीवर पाठीमागे बसलेले एक इसम जखमी जखमी झाला असून या अपघातात दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले आहे.

सौरभ भोजनी (वय–२०) हा त्याच्या ताब्यातील स्कुटी घेऊन भरधाव वेगाने चालला असताना त्याने त्याच्या पुढे जाणाऱ्या वॅगेनर गाडीस पाठीमागून ठोकर मारून केलेल्या अपघातात त्याच्या स्कुटीवर पाठीमागे बसलेले ज्ञानेश्वर पाटील (वय–४५) हे डोक्यास गंभीर दुखापत होऊन जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# महाराष्ट्राच्या पवित्रभूमीत गौरवशाली योध्दा जन्मले, येथे येण्याचे भाग्य मला लाभले : कर्नल समयसिंग

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

कोरोनाचा वाढता धोका लक्षात घेता व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्हधारक वीर यशवंतराव घाडगे उत्सव शासकिय अधिकारी, कर्मचारी व माजी सैनिकांच्या उपस्थितित माणगांवच्या प्रांताधिकारी प्रशाली जाधव दिघावकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तहसिलदार प्रियंका आयरे, वरिष्ठ पोलिस निरिक्षक अश्वनाथ खेडकर तसेच भारतिय सेनेतील प्रमुख मान्यवर कर्नल समयसिंग,सहाय्यक जिल्हा सैनिक अधिकारी गोविंदराव साळूंखे, वीर यशवंत संघटना अध्यक्ष विष्णू सावंत उपाध्यक्ष विनायक चांदोरकर तसेच माजी सैनिकांचे मुख्य उपस्थितित शहिद वीर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अत्यंत साधेपणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे सुरुवातीला कर्नल समयसिंग यांनी आपल्या भाषणात शहिद वीर यशवंतराव यांच्या पत्नी लक्ष्मीबाई घाडगे कोरोनापरिस्थिती व प्रकृतीअस्वास्थ्यचे कारणास्तव हजर नसल्यामुळे त्यांचे घरी आज पाटणुस तालुका माणगांव जिल्हा रायगड येथे जाऊन 'श्रीमती बर्फी देवी मनफुल सिंह फाउंडेशन' कडून वीरपत्नी श्रीमती लक्ष्मीबाई यांना एक लाख एकहजार रुपयांचा धनादेश व साडी श्रीफळ भेट देऊन सन्मानित करणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्र ही पवित्र भूमी असुन असे अनेक गौरवशाली योध्दा या पवित्र भूमीत जन्मले आहेत. आज या पवित्र भूमीत मला उपस्थित राहण्याचे सौभाग्य प्राप्त झाल्याने मला खुप आनंद झाला आहे.

अशा प्रकारेच शौर्य गाजवित शहिद झालेल्या आणखी ३५ शहिद जवानांचे गावी जाऊन त्यांचा मराठा रेजिमेंट च्या वतिने मी सन्मान करणार आहे. यानंतर कर्नल यांनी उपस्थितांना जय महाराष्ट्र!, बोल.. छत्रपती शिवाजी महाराज कि जय! व मराठा रेजिमेंटचा विजय असो! अशा प्रेरणादायी घोषणा देत उपस्थितांना मागुन बोलण्यास सांगुन येथिल स्मारक परिसरात देशभक्तीपर घोषणांनी स्फुलिंग संचारले.

कार्यक्रमाचे सुरुवातीला उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगांव येथे ध्वजारोहन करुन शहिद वीर यशवंतराव घाटगे ( व्हि. सी) पुतळ्या जवळ मान्यवरांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक, प्रमुख अतिथींचे स्वागत, अध्यक्षांचे मनोगत व आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम झाला. जयंती उत्सवात कधीही खंड पडू दिला नाही, या कार्यक्रमांतून जयंती उत्सव साजरे करण्यामागे मुळ उद्देश हा कि यापासून काहीतरी प्रेरणा घेऊन समाजासाठी आपण काहीतरी चांगल काम केल पाहीजे. त्यासाठी प्रत्येकाने सिमेवर जाऊन लढल पाहीजे अस नसून, आता कोरोना पॅनडॅमिक ची स्थिती आहे. तेंव्हा कोरोनाचे नियम पाळून आपल्या गावातील सर्वांनी लसिकरणासाठी प्रयत्न करावेत. जेणेकरुन आपल्या सगळ्यांचे जीव वाचले पाहीजेत! असे उद्बोधक वक्तव्य प्रांताधिकारी यांनी केले.

विशेष म्हणजे कोरोना नियमांचे पालन करीत सैनिक निलेश घाडगे, जयेश सुर्वे, सचिन विचारे व माजी सैनिक अनुक्रमे सुभेदार मेजर संतोष कदम, शिरिष पवार, शिवाजी सावंत, ऋषीकेश शिंदे, प्रकाश मोरे, महेंद्र गजमल, सहदेव खैरे, सुभाष घाडगे, अजय शेलार,सत्यनारायण गुडवली, श्याम सापळे, स्वप्निल वाघ, शैलेश गजमल, दगडू सालेकर, प्रताप बांदल, दिपक जाधव, बळीराम म्हात्रे, माजी सैनिक पत्नी सुराणा घाडगे, अनुसया कदम, अंजली गोसावी, व माजी सैनिकांचे पाल्य संजय व अजय घाडगे या कार्यक्रमास हजर होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पोंगल सण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे नोड तमिल संगम फाउंडेशनच्यावतीने सेक्टर १९ मध्ये सहाव्या पोंगल उत्सव २०२२ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते शरद खारकर, अमर म्हात्रे, शैलेश भगत, निलेश खारकर, ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, नंदकुमार ठाकूर, महिला मोर्चा उपाध्यक्ष समृद्धी अडसुळे, प्रिया मॅडम, अम्मा इंटरप्रायझेसचे संचालक व्ही. राजा, भाजप साऊथ सेलचे अध्यक्ष मसानम, उपाध्यक्ष कृष्णन, उलवे नोड तमिल संगम फाउंडेशनचे अध्यक्ष पेनिअल. एस, उपाध्यक्ष अल्लाबक्ष, सचिव सुगुमार. एम, खजिनदार सेल्वराज नैनार, समन्वयक मसानम राजराथनम, सहसचिव गणेश. एस, बालन मोहन, सल्लागार संकरा नारायणम, राजेंद्रन. पी, राजेंद्रन जी. एफ., दिनकरण पी, टी. पी. राजू यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी तमिल संगमच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले तसेच पोंगलनिमित्त सणासाठी अन्नधान्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नागरिकांना देण्यात आले.

## मॅकविलाच्या गिर्यारोहकांनी वानरलिंगी सुळका सर करून सिंधुताई सपकाळ यांना दिली अनोखी गिर्यारोहण मानवंदना

### श्रद्धांजली वाहून फडकविला तिरंगा

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांना सुधागड तालुक्यातील मॅकविला द जंगल यार्ड मधील साहसी प्रस्तरारोहकांनी अनोखी गिर्यारोहण मानवंदना दिली आहे. शुक्रवारी (ता.७) पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील वानरलिंगी हा ४०० फूट सुळका सर केला. सुळक्याच्या टोकावर पोहचून सिंधुताई सपकाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली आणि गिर्यारोहण मानवंदना देण्यात आली. तसेच भारताचा झेंडा फडकवण्यात आला.

या मोहिमेत सुधागड तालुक्यातील प्रस्तरारोहक व 'मॅकविला द जंगल यार्ड' चे संस्थापक मॅकमोहन हुले आणि त्यांचे सहकारी प्रणय पाटील, अभिजीत राजगुरू व विकी घोडके हे सहभागी होते. गुरुवारी (ता.६) रात्री ९ च्यासुमारास आपल्या ७०–८० लिटर बॅकपॅक सहित मोटार सायकलवरून जुन्नरला पोहचले. शुक्रवारी (ता.७) सकाळी ११ वाजता सुळक्याजवळ पोहोचले. दुपारी एक वाजता वानरलिंगी सुळका प्रस्तारोहन चालू केले.

मॅकमोहन यांनी प्रथम प्रस्तरारोहणाला सुरुवात केली. त्यांना सुरक्षा दोर प्रणय पाटील यांनी दिला. अनेक मोहीमांचा अनुभव असलेल्या या गिर्यारोहकांनी सुरक्षितेचे भान ठेवून चार तासात हा सुळका सर केला. व तेथे सिंधुताईंना अनोखी श्रद्धांजली व गिर्यारोहण मानवंदना दिली.



# पनवेलमधील २१ शाळा होणार मॉडेल स्कूल

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या निकषानुसार राज्यातील ३०० शाळा ह्या आदर्श शाळा होणार आहेत. सर्व पायाभूत, भौतिक, शैक्षणिक व शासकीय निकषानुसार या शाळा परिपूर्ण अशा होणार आहेत. पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २१ शाळा या आदर्श शाळा म्हणून विकसित केल्या जाणार असून त्याचा आदर्श पनवेलमधील अन्य शाळा घेणार असल्याचे पनवेलचे गटशिक्षणाधिकारी महेश खामकर यांनी सांगितली आहे.



राज्याच्या शिक्षण विभागाने राज्यातील ३०० शाळा आदर्श शाळा तयार करण्याचे घोषित केली आहे .या शाळांमध्ये राज्य व केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे सर्व उपाययोजना करून आदर्श शाळा निर्माण केल्या जाणार आहेत. पनवेल तालुका हा शिक्षणाचे जाळे विणलेला तालुका आहे.

रायगड जिल्ह्यात सर्वाधिक शाळांचे जाळे व जास्त शाळांची संख्याही पनवेल तालुक्यात आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २१ शाळा या आदर्श शाळा करण्याचे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील यांनी घोषित केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यातील २१ जिल्हा परिषद शाळा पनवेलचे गटशिक्षणाधिकारी महेश खामकर यांच्या सहकार्याने आदर्श व समृद्ध शाळा करण्यासाठी एक कार्यशाळा कळंबोलीतील के एल.ई कॉलेज मध्ये घेण्यात आली. यावेळी पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषदेचे केंद्रप्रमुख, खाजगी शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, गट समन्वयक असे मोठ्या संख्येने शिक्षक प्रतिनिधी उपस्थित कार्यशाळेचे सूत्रसंचालन केंद्र प्रमुख लिंबाजी गीते यांनी केले.

> मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार पनवेल तालुक्यातील २१ जिल्हा परिषदेच्या आदर्श शाळा करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करून ग्रामस्थ, समन्वयक, केंद्रप्रमुख खाजगी शाळांचे प्राचार्य यांचे सहकार्य घेऊन समृद्ध शाळा करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचा मानस आहे.
>
> **महेश खामकर,**
> **गटशिक्षणाधिकारी**

## संजीवनी सेवाभावी संस्थेकडून आरोग्य शिबीर ; वडवलीत आरोग्य शिबिराला प्रतिसाद

### २४० रूग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून मिळाले उपचार व मार्गदर्शन



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील संजीवनी सेवाभावी संस्थेच्या वतीने रविवारी, ९ जानेवारी २०२२ रोजी वडवली येथील आगरी समाज मंदीरात मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. मुंबईतील लायन ताराचंद बापा हॉस्पिटल व संजीवनी कॅन्सर केअर हॉस्पिटल येथील तज्ज्ञ डॉक्टर यांनी तपासणी करून वैद्यकीय सेवा दिली. या शिबिराला नागरिकांचा मोठया संख्येने प्रतिसाद मिळाला.

ग्रामीण भागातील जनतेला वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने हे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. प्रसिद्ध अस्थीविकार तज्ज्ञ डॉ.जयंत गावंड, देवेंद्र भोसले, आदित्य माणके, अजित पाशीलकर, नंदा कदम, अजित कोरडे, शमीम, गुरुबच्चन सिंग खन्ना या डॉक्टरांनी तसेच नर्सिंग स्टाफ यांनी तपासणी व मार्गदर्शन करून मोलाचे योगदान दिले. एकूण २४० रुग्णांना रक्तदाब, शुगर, ईसीजी, हृदयविकार, स्त्रियांचे आजार, तसेच हाडांचे आजार अशा विविध आजारांवर उपचार व आरोग्य विषयक मार्गदर्शन या ठिकाणी डॉक्टरांकडून देण्यात आले.

या संपूर्ण शिबिराच्या आयोजनासाठी संजीवनी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष कुमार गाणेकर, उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील महेश चौलकर, नवनाथ कांबळे, जयवंत कांबळे, विजेश कांबळे, रफिक जहांगीरदार, नुझहत जहांगीरदार, मनोज चौलकर, संदेश गाणेकर, दिपक नाक्ती, योगेश बिराडी, प्रमोद कांबळे, प्रताप पाटील, सुकुमार चौलकर, ओमकार गाणेकर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी माजी सभापती मीना गाणेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण चाळके सरांनी उत्तमरीत्या केले.

शिबिराच्या उद्घाटन सोहळ्यासाठी संतोष नाक्ती, पोलिस पाटील, दिलीप नाक्ती, दिपक कांबळे, विजय पांडव, संतोष पाटील, बळीराम कांबळे, सुदेश कांबळे, श्याम धुमाळ, विठोबा नाक्ती, महेश नाक्ती, हरिश्चंद्र चाळके आदी मान्यवर उपस्थित होते. वडवली पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने या शिबिराचा लाभ घेतला. संजीवनी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व सर्व सदस्य यांनी आगरी समाज वडवली व सर्व वडवली ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

## महापालिकेकडून शिवसेना पक्षाचे फलक काढण्याची होत असलेली कारवाई थांबविण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रात शिवसेनेच्या विचारांना मानणारा मोठा जनसमुदाय आहे. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना प्रेरित होवून समस्त शिवसैनिक समाज हिताचे काम करतात. महाराष्ट्र शासनाने लोकहितासाठी घेतलेले समाज हिताचे निर्णय लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने शहरातील प्रत्येक चौकात फलक लावून लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम शिवसेना शाखेतून करण्यात येते. परंतु राजकीय कुलशित हेतूने शिवसेना पक्षातर्फे लावण्यात आलेले चौकातल माहिती फलक आपया कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून काढण्यात येत आहे. सदरहू माहिती फलकाबाबत कोणत्याही व्यक्तींची हरकत अथवा तक्रार सुद्धा नसताना फलक काढण्याची होत असलेली कारवाई थांबविण्याची मागणी शिवसेना महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, सदर माहिती फलकावर मुख्यमंत्री तथा अनेक मंत्र्यांचे फोटो असतात. तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचाही फोटो असतो. सदरहू सुचना फलक काढत असताना आपले कर्मचारी सदरहू माहिती फलक हे असभ्यरित्या काढत आहेत. जेणेकरून वंदनिय नेत्यांचा अपमान होत आहे. आपल्या कार्यालयाकडून शिवसेना शाखेस सदरहू माहिती फलक काढण्याबाबत कोणतीही नोटीस देण्यात आलेली नाही. माहिती फलक हे समाजोपयोगी कामाकरिता व सरकारी निर्देश लोकांपर्यंत पोहोचविण्याकरिता लावण्यात आलेले आहे. जेणेकरून लोकांपर्यंत लोकहिताची माहिती पोहोचवली जाईल. शिवसैनिकांचा हेतू हा शुद्ध असल्या कारणाने आपण सरहूचे फलक लोकहिताचे असल्या कारणाने सदरहू माहिती फलकावर कारवाई करणे अत्यंत गैर असल्याचे रामदास शेवाळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच शहरातील तथा महानगरपालिका हद्दीत अनेक ठिकाणी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करून अनेक व्यवसाय थाटलेले आाहेत. सदरहू बेकायदेशीर अतिक्रमणांवर कोणतेही कारवाई होत नाही. पदपथावर देखील अनेक लोकांनी अतिक्रमण केले आहेत. सदर अतिक्रमणांबाबत महापालिकेकडे अनेक वेळा तक्रारी करून सुद्धा फेरीवाले व सरकरी जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कोणतीही कायदेशीर कावाई न करता त्यांना सरंक्षण दिले जाते. पनवेल महापालिका अतिक्रमण विभागाकडून शिवसेनेच्या फलकावर होत असलेली कारवाई थांबवली नाही तर आपल्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केले जाईल, असा इशारा रामदास शेवाळे यांनी दिला आहे.

## मधल्या कुडपणमध्ये आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मिनी महाबळेश्वर म्हणून सर्वश्रुत असलेल्या कुडपण बुद्रुक कुडपण खुर्द आणि मधल्या कुडपण या ब्रिटीशकालीन नियोजित हिलस्टेशन असलेल्या थंड हवेच्या ठिकाणांपैकी मधल्या कुडपण येथे पौष शुध्द एकादशीनिमित्त सद्गुरू श्रीगणेशनाथ महाराजांच्या आशीर्वादाने आणि तपोनिधी श्रीअरविंदनाथ महाराजांच्या आशिर्वादाने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन आज मंगळवार, दि. ११ जानेवारी २०२२ पासून सुरू होत आहे.

शुक्रवार, दि. १४ जानेवारी २०२२ पर्यंत चालणाऱ्या या अखंड हरिनाम सप्ताह सो– हळ्यामध्ये मंगळवारी ध्वजारोहण, कलशारोहण आणि विणापूजन आदी कार्यक्रम झाल्यानंतर काकडआरती, नित्यपाठ, ज्ञानेश्वरी पारायण आणि हरिपाठ, देवीची आरती, प्रवचन, भोजन, हरीकिर्तन व हरीजागर असे दैनदिन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. गुरूवारी दिंडीसोहळा आणि हळदीकुंकू तसेच शुक्रवारी काल्याचे किर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## बारमधून तीन मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बारमध्ये काम करणारे कर्मचारी तेथील रूममध्ये झोपले असताना तेथे आलेल्या एका इसमाने त्या रूममधील तीन मोबाईल चोरी करून पळून गेल्याची घटना असूडगाव परिसरात घडली आहे.

असूडगाव से.–४ येथील बारमध्ये काम करणारे कर्मचारी अरूण पासवान व त्यांचे दोन मित्र तेथील एका रूममध्ये झोपले असताना यावेळी त्यांचा सहकारी हृतिक सिंग याचा भाऊ अमितकुमार सिंग याने त्याला भेटण्याचा बहाना करून त्या रूममध्ये प्रवेश केला व तेथील तीन मोबाईल फोन चोरून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.